# बृहन्मुंबई महानगरपालिका

## करनिर्धारण व संकलन खाते

### जाहिरात

**क्र.कवसं/1917/एमसी/2024-25 दि.16.09.2024**

मान. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र.एमजीसी/एफ/3532 दि.11.06.2024 नुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील **'करनिर्धारण व संकलन'** खात्याच्या आस्थापनेवरील गट-क मधील **"निरीक्षक"** या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद केलेली **178** रिक्त पदे, ऑनलाईन अर्ज मागवून, ऑनलाईन वस्तुनिष्ठ परीक्षा घेऊन सरळसेवेने भरावयाची आहेत. सदर पदासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment/Assessment & Collection** या संकेतस्थळावर प्रस्तृत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत असून, त्यासाठी उमेदवारांनी **"निरीक्षक पदाकरीता ऑनलाईन अर्ज"** या लिंकवरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज विहित मुदतीत सादर करावेत.

**"निरीक्षक"** संवर्गातील पदासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहित अर्हता/अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत.

**ऑनलाइन अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.** भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच इतर माहिती वेळोवेळी ऑनलाइन पद्धतीने देण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे.

सरळसेवेने भरावयाच्या **"निरीक्षक"** संवर्गातील पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| **पदाचे नाव** | : | **'निरीक्षक'** |
| **वेतनश्रेणी (सुधारीत)** | : | **स्तर - M 17 - रु. 29,200-92,300** |
| **भरावयाच्या रिक्त पदांची संख्या** | : | **178** |
| **गट** | : | **'क'** |

**(1) सरळसेवा पध्दतीने ''निरीक्षक'' या संवर्गाची भरावयाची रिक्त पदे.**

**(अ) सरळसेवा पध्दतीने "निरीक्षक" या संवर्गाची भरावयाची रिक्त पदे.**

| तपशील | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.शै.मा.व. | आ.दु.घ. | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण भरावयाची पदे | 11 | 3 | 3 | 4 | 2 | 0 | 0 | 32 | 18 | 18 | 87 | **178** |

**(ब) उपरोक्त रिक्त पदांचे प्रवर्गनिहाय सामाजिक व समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | समांतर आरक्षण | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सा.शै.मा.व. | आ.दु.घ. | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण | 3 | 2 | 2 | 2 | 1 | 0 | 0 | 9 | 6 | 6 | 29 | **60** |
| 2 | महिला (30%) | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 10 | 5 | 5 | 26 | **53** |
| 3 | माजी सैनिक (15%) | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 5 | 3 | 3 | 13 | **27** |
| 4 | प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 4 | **9** |
| 5 | भूकंपग्रस्त (2%) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | **3** |
| 6 | खेळाडू (5%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 1 | 4 | **9** |
| 7 | अंशकालीन पदवीधर (सुशिक्षित बेरोजगार)(10%) | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 9 | **17** |
| 8 | **एकूण** | **11** | **3** | **3** | **4** | **2** | **0** | **0** | **32** | **18** | **18** | **87** | **178** |
| 9 | अनाथ मुलांसाठी (1%) (178 x 1% = 2 पदे) | परिपत्रक क्र.एमबीसी/9476, दि.26.04.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03, दि.06.04.2023 अन्वये प्राप्त निर्देशानुसार, 178 पदांपैकी **संस्थात्मक प्रवर्गाकरीता 01 पद व संस्थाबाह्य प्रवर्गाकरिता 01 पद अशी 02 पदे आरक्षित होत आहेत.** | | | | | | | | | | | |
| 10 | दिव्यांगांसाठी (4%) (178 x 4% = 7 पदे) | परिपत्रक क्र.एमबीसी/4270, दि.11.07.2019 संलग्नित शासन निर्णय क्र. दिव्यांग 2018/प्र.क्र.114/16-अ, दि.29.05.2019 अन्वये **07 पदे आरक्षित होत आहेत.** **(गट-अ – 02, गट-ब – 02, गट-क – 02, गट-ड/गट-ई – 01)** | | | | | | | | | | | |

★ उपरोक्त नमूद सामाजिक आरक्षणामधील वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) हे प्रवर्ग आंतरपरिवर्तनीय आहेत.

★ अधिसंख्य पदावर सेवा वर्ग करण्यात आलेली "निरीक्षक" संवर्गातील 04 पदे रिक्त पदांमध्ये समाविष्ट आहेत.

**(क)"निरीक्षक" या संवर्गातील पदाकरिता दिव्यांगासाठी एकूण 07 पदे आरक्षित असून सदर पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवाराने, खालील नमूद दिव्यांग प्रकार, शारीरिक पात्रता व पदाची जबाबदारी आणि कर्तव्ये विचारात घेऊन अर्ज करणे आवश्यक आहे.**

| संवर्ग | भरावयाची पदे | दिव्यांग प्रकार | | | | | शारीरिक पात्रता | जबाबदारी आणि कर्तव्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (गट-अ) अंध / अंशतः अंध | (गट-ब) श्रवण शक्तीतील दोष | (गट-क) चलनवलन विषयक विकलांगता | (गट-ड) मानसिक अपंगता | (गट-ई) एकाधिक अपंगाचा समावेश | | |
| **निरीक्षक** | **07** | **B= Blind** (अंध)<br>**LV= . Low Vision** (अल्पदृष्टी) | **D=Deaf** (कर्ण बधिरता)<br>**HH= Hard to Hearing** (ऐकू येण्यातील दुर्बलता) | **OA= One Arm** (एक हात, अस्थिव्यंगता)<br>**BA = Both Arms** (दोन्ही हात अस्थिव्यंगता)<br>**OL= One Leg** (एक पाय अस्थिव्यंगता)<br>**BL= Both Leg** (दोन्ही पाय अस्थिव्यंगता)<br>**OAL= One Arm and One Leg** (एक हात आणि एक पाय अस्थिव्यंगता)<br>**CP= Cerebral Palsy** (उन्माद पक्षाघात)<br>**LC= Leprosy Cured** (कुष्ठरोग)<br>**Dw= Dwarfism** (शारीरिक वाढ खुंटणे)<br>**AAV= Acid Attack Victims** (आम्ल हल्लाग्रस्त)<br>**Mdy= Muscular Dystrophy** (स्नायू विकृती) | **MI= Mental Illness** (मानसिक आजार) | **MD involving (a) to (d) above =Multiple Disabilities involving** ( ए ते डी मधील एकाधिक अपंगाचा समावेश) | S=Sitting- (बसणे)<br>ST=Standing (उभे रहाणे),<br>W=Walking (चालणे),<br>BN=Bending (वाकणे)<br>RW=Reading & Writing ( वाचणे आणि लिहिणे)<br>SE=Seeing (पाहणे)<br>H=Hearing (ऐकणे)<br>C=Comunication (संभाषण कौश्यल्य) | 1. मालमत्तांचे करपात्र मूल्य निश्चित करण्याच्या/ सुधारण्याच्या दृष्टीने मालमत्तांचे नियतकालिक निरीक्षण घेणे तसेच रिक्ततेची पडताळणी करण्याकरिता मालमत्तांचे निरीक्षण करणे, अन्य खात्यांकडून प्राप्त झालेल्या संदर्भांवर स्थळ निरीक्षणांती अहवाल तयार करणे व त्याअनुषंगाने येणारी अन्य कामे पार पाडणे.<br>2. मालमत्तांचे करनिर्धारण व मालमत्ता कर तसेच शासकीय करवसुलीच्या संदर्भात मनपा आयुक्तांनी विभाग निरीक्षकास मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार प्रत्यायोजित केलेले अधिकार वापरणे, तसेच कर्तव्ये पार पाडणे.<br>3. सर्व देयके, मागणीच्या सूचना, दंडाच्या सूचना, जप्तीच्या अनुसूची व पूर्वसूचना बजावणे व संबंधित कामे.<br>4. गाठावयाचे उद्दिष्ट विचारात घेऊन मालमत्ता कर वसूल करणे.<br>5. कार्यपध्दतीनुसार क्षेत्रपुस्तिका व अन्य नोंदवह्या ठेवणे व पत्रव्यवहार त्वरेने निकालात काढणे.<br>6. वरिष्ठांच्या सूचनानुसार, अपील, वाद, लिलाव विक्री, वाद मिटविणे, इत्यादी कामाकरिता न्यायालये, कार्यालये व अन्य ठिकाणी आवश्यकतेनुसार उपस्थित राहणे.<br>7. प्रतिवर्षी हिशोबाचा मेळ घालणे व मालमत्ता कराच्या थकबाकीच्या नोंदवह्या ठेवणे.<br>8. महानगरपालिकेच्या निवडणुका व तत्संबंधी कामे करणे.<br>9. भांडवली मूल्याधारित कर प्रणाली संबंधीत विभागस्तरावरील कामे.<br>10. उमेदवार योग्य ती सॉफ्टवेअर साधने आणि उपकरणे यांच्या सहाय्यासह ग्राह्य धरण्यात येईल. |
| **एकूण** | **07** | **02** | **02** | **02** | **01** | | - | - |

**★परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 संलग्नित शासन निर्णय क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार, शासन शुध्दीपत्रक क्र. दिव्यांग-2024/प्र.क्र.15/दि.क.2 दि.04.06.2024 अन्वये Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्य Spinal Defomity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.त्यानुसार शासन सेवेतील जी पदे अस्थिव्यंग (Locomotor Disability) प्रवर्गांतर्गत OA,OL,BA BL,OAL,BLOA व BLA या दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्यात आलेली आहेत, अशी सर्व पदे Spinal Defomity (SD) and Spianl Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction या स्वतंत्र उपप्रकारांसाठीसुध्दा सुनिश्चित राहतील.**

**टिप:-**

(1)भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.

(2)रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक व समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर अंशत: किंवा पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

(3)समाजिक व अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

(4)दिव्यांग उमेदवारांनी सदर पदाची कर्तव्ये, जबाबदारी, अपेक्षित शारिरीक क्षमता/पात्रता याबाबतची अपेक्षा दर्शविणारी माहिती संदर्भित करुन त्याप्रमाणे अर्ज करणे आवश्यक आहे. 40% पेक्षा कमी दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज केल्यास अशा उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.

(5)दिव्यांग उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे खुला प्रवर्गातील उपलब्ध पदांमधून रिक्त ठेवण्यात येतील.

(6) दिव्यांग पदसुनिश्चितीनुसार विहित पात्रता धारण करणारे दिव्यांग उमेदवार त्या-त्या जात प्रवर्गात आरक्षित होत नसले व अर्ज करणेसाठी पात्र असले, तरी असे उमेदवार सर्वसाधारण गटातून अर्ज करु शकतात व ते गुणवत्तेनुसार सर्वसाधारण गटातून निवडीस पात्र ठरु शकतात व त्यांना सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे सेवा शर्ती लागू राहतील.

(7)बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागास वर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/2867 दि.11.11.2021 सोबतचा महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2 दि.05.10.2021 अन्वये प्राप्त निर्देशानुसार व विशेष सूचनांनुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षेप्रमाणे लेखनिक व इतर सोयी-सवलती लागू असतील.

(8)अराखीव (खुला) पदांकरिता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्ग उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने, सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

(9)आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस) उमेदवारांकरिता वित्तीय वर्ष 2022-2023 /2023-2024 करिता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो-4019/प्र.क्र.31/16अ दि.12.02.2019 दि.31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

(10)सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) उमेदवारांकरिता वित्तीय वर्ष 2022-2023 /2023-2024 करिता महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-2024/प्र.क्र.75/आरक्षण-5 दि.28.06.2024 अन्वये विहीत करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

(11)एका उमेदवारास एकच अर्ज सादर करता येईल. कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास, त्यामधील अर्जाची / फी भरल्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंद झालेल्या अर्जाची फी जप्त करण्यात येईल.

(12)मागास प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गामध्ये भरतीकरिता अर्ज करण्याची मुभा राहील.

**(2) सामाजिक व समांतर आरक्षण.**

1. **महिलांसाठी 30% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2 दि.25.05.2001 अन्वयेच्या शासन निर्देशानुसार भरण्यात येतील. तथापि, एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.
2. **माजी सैनिकांसाठी 15% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.आरटीए-1079/0/482/16-अ, दि.16.04.1981 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. शासन निर्देशानुसार,माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास अशी पदे सदर भरती वर्षाकरिता रिक्त ठेवण्यात येतील. माजी सैनिकांकरिता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील. माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांना जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत, प्रथम कागदपत्रे पडताळणीच्या वेळी व नंतर नियुक्तीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.
3. **प्रकल्पग्रस्तांसाठी 5% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम,1999-सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11 नुसार शासनाने विहित केलेल्या नियमाच्या अनुषंगाने, त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एईएम-1080/35/16-अ दि.21.01.1980 तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर मार्गदर्शक तत्वानुसार, नगरबाह्य विभागातील ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलप्रकल्पासाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठी पदे आरक्षित आहेत व ठाणे जिल्ह्यातील भातसा धरण प्रकल्पासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेचा ठराव क्र.231 दि.01.12.2020 अन्वये मंजूर झालेल्या 28 प्रकल्पग्रस्तांची गणना यामध्ये करण्यात येईल. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.
4. **भूकंपग्रस्तांसाठी 2% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. भूकंप-1009/प्र.क्र.207/2009/16-अ दि.27.08.2009 आणि शासन निर्णय क्र.भूकंप-1008/प्र.क्र.145/2008/16-अ दि.27.10.2008मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. तसेच, शासन निर्णय क्र.विकाक2215/ प्र.क्र.337/16-अ दि. 04.11.2016 अन्वये दिलेल्या निर्देशानुसार भूकंपग्रस्तासाठी आरक्षित असलेल्या पदाकरीता पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सदर पदे प्रकल्पग्रस्तांमधून भरण्यात येतील. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार भुकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

5. **खेळाडूंसाठी 5% प्रमाणे** आरक्षित पदे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एमपीएम विभागाचे परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/1260 दि.31.01.2017 सोबतचा महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्रक्र.68/क्रीयुसे-2 दि.01.07.2016 तसेच सम क्रमांकाचे शासन शुद्धीपत्रक दि.18.08.2016 आणि शासन निर्णय क्र.संकीर्ण-1716/प्र.क्र.18/क्रीयुसे-2 दि.30.06.2022 मधील दिलेल्या निर्देशानुसार शासन मान्य क्रीडा प्रकारातील अत्युच्च गुणवत्ताधारक स्त्री व पुरूष खेळाडूंसाठी 5% समांतर आरक्षण ठेवण्यात येईल.

खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वीच विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-2002/प्रक्र.68/क्रीयुसे-2 दि.01.07.2016 अन्वये सुधारित तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्याकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीच्यावेळीच विभागीय उपसंचालक,क्रिडा व युवक सेवा यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरिता, संबंधीत उपसंचालक,क्रिडा व युवक सेवा कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.
खेळाडु आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांच्या राज्य/ राष्ट्रीय स्पर्धेच्या प्रमाणपत्राबाबत शंका उद्ववल्यास आयुक्त/संचालक क्रीडा व युवक सेवा,पुणे यांच्याकडून विचारणा करण्यात येईल.(शंका उद्भवल्याप्रकरणी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडील प्रमाणपत्र पडताळणी नंतर नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल)

6. **अंशकालीन पदवीधर (सुशिक्षित बेरोजगार)10% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासनाच्या 'सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य'हया योजनेंअतर्गत राज्य शासनाच्या कार्यालयात तीन वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी 10% समांतर आरक्षण लागू करण्यात आले असून, महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.पअंक-1009/ प्र.क्र.200/2009/16-अ दि.27.10.2009, शासन निर्णय क्र.अंशका1913/ प्र.क्र.57/ 2013/16-अ दि.19.09.2013 व शासन निर्णय क्र.अंशका 1918/ प्र.क्र.507/16-अ दि.02.01.2019 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार पदवीधर अंशकालीन उमेदवारांकरिताचे आरक्षण राहील.

7. **अनाथांकरिता 1% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-2022/प्र.क.122/का-03 दि.06.04.2023 सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि.10.05.2023 मधील निर्देशानुसार भरण्यात येतील. प्रस्तृत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार,संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाह्य प्रवर्गातील अनांथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाची कार्यपद्धतीचा अवलंब करून, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाही, तर ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. तसेच अनाथ व्यक्तींचे आरक्षण यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार राहील. अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

8. **दिव्यांग आरक्षण 4% प्रमाणे** आरक्षित पदे, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम 2016 च्या आधारे महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.दिव्यांग2018/प्र.क्र.114/16-अ दि.29.05.2019 तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असलेली पदे भरावयाच्या एकूण पद संख्येपैकी असतील.दिव्यांग आरक्षणांतर्गत अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे शासकीय सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/604 दि.29.04.2021 सोबतचा महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग-2021/प्र.क्र.33/नवि-28 दि.16.04.2021 मधील निर्देशानुसार, सदर संवर्गाकरिता दिव्यांगांची पदे सुनिश्चित करण्यात आलेली आहेत. सदरचा तपशील अनु क्र.1 (क) तक्त्यात नमूद करण्यात आला आहे. लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रकि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र तसेच शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2024/प्र.क्र.86/दि.क.2 दि.27.06.2024 अन्वये वैश्विक ओळखपत्र (UDID CARD) सादर करणे अनिवार्य आहे. शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व दिव्यांग प्रवर्गातर्गत निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/36 दि.21.12.2009 मधील निर्देशांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व वैद्यकीय मंडळाने तो उमेदवार संबंधित पदावर काम करु शकेल असे प्रमाणपत्र दिल्यानंतर अंतिम नियुक्ती केली जाईल.

परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 संलग्नित शासन निर्णय क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Defomity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.

9. **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (ईडब्लूएस)सरळसेवेने भरण्यात येणारी 10% प्रमाणे** आरक्षित पदे, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो/4019/प्र.क्र.31/16-अ दि.12.02.2019 व सम क्रमांकाचा शासन निर्णय दि.31.05.2021 मधील निर्देशानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची (ई.डब्ल्यु.एस.) रिक्त पदे भरण्यात येतील. तसेच, सदर शासन निर्णय आणि शासन परिपत्रक क्र.राआधो2023/प्र.क्र.40/16-अ दि.23.03.2023 मधील निर्देशानुसार विहित करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी संबंधित तहसिलदार यांनी वितरित केलेले व राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरिता राज्य शासनाचा प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक आहे. केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, राज्य शासकीय सेवांसाठीच्या पदभरती करिता वापरता येणार नाही.

10. **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग सरळसेवेने भरण्यात येणारी 10% प्रमाणे आरक्षित** पदे, सन 2024 चा महाराष्ट्र शासन अधिनियम क्रमांक 16, दि.26.02.2024 चा महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम 2024, तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी 2024/प्र.क्र.75/16-क दि.27.02.2024 मधील निर्देशांनुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाची (एस.ई.बी.सी.) रिक्त पदे भरण्यात येतील. तसेच, शासन शुध्दीपत्रक क्र.बीसीसी-2024/प्र.क्र.75/आरक्षण-5 दि.28.06.2024 मधील निर्देशानुसार विहित करण्यात आलेली कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग उमेदवारांकरीताचे आरक्षण राहील. प्रस्तृत भरती प्रक्रियेअंतर्गत निरीक्षक पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र. संकीर्ण-2024/प्र.क्र.79/आरक्षण-5 दि.19.04.2024 मधील निर्देशांनुसार प्रलंबित असलेल्या न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येईल.

11. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/9520 दि.11.04.2001 सोबतचा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-1997/प्र.क्र.63/97/16-ब दि.18.10.1997 मधील निर्देशानुसार, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून, आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवारांचा विचार, गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

12. आरक्षण/अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे.

**(3) <u>"निरीक्षक" या पदाकरिता आवश्यक अर्हता. (सरळसेवेने 50% पदे)</u>**

1. उमेदवार कोणत्याही शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा.
2. उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेमध्ये 100 गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.
3. उमेदवार डी.ओ.इ.ए.सी.सी. सोसायटीचे सी.सी.सी. किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए' स्तर किंवा 'बी' स्तर किंवा 'सी' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी' किंवा 'जी.इ.सी.टी.' चे प्रमाणपत्र धारण करणारा असावा, किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सूट देण्याकरिता महाराष्ट्र शासन यासंदर्भात वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.
4. उमेदवाराजवळ मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे प्रत्येकी 30 शब्द प्रति मिनिट वेगाचे शासनाचे व्यवसायिक प्रमाणपत्र असावे.

**उपरोक्त अर्हतेतील अनु.क्र.1 अनुषंगाने,**

1. परिपत्रक क्र.एमपीएम/2/3351 दि.09.07.2024 संलग्नित शासन निर्णय आरटीए-1082/2327/सीआर-63/16-अ दि.05.10.1989 नुसार माजी सैनिकांना शासन सेवेत वर्ग 3 व 4 मधील राखीव पदांवर नियुक्तीसाठी काही शैक्षणिक सवलती देण्यात आल्या आहेत त्यानुसार निरीक्षक पदाच्या अर्हतेतील अनु.क्र.1 मधील शैक्षणिक अर्हतेऐवजी 15 वर्षे सैनिकीसेवा झालेले माजी सैनिक, जे एस.एस.सी. उत्तीर्ण असतील किंवा 'इंडियन आर्मी स्पेशल सर्टिफिकेट ऑफ एज्युकेशन' अथवा तत्सम प्रमाणपत्र धारक असतील, अशा माजी सैनिक उमेदवारांना सदरची शैक्षणिक पात्रता शिथिल करुन नेमणूकीसाठी माजी सैनिक या समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांचा विचार करण्यात येईल.
2. उपरोक्त अर्हतेतील अनु.क्र.4 च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

अ) परिपत्रक क्र.एमपीएम/2/3351 दि.09.07.2024 च्या सोबतचा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2018/प्र.क्र.180/28 दि.13.06.2019 नुसार शासन सेवेत माजी सैनिक उमेदवारांना जर गट-क संवर्गातील पदावर नियुक्ती मिळाली, तर ज्या पदांसाठी टंकलेखन अर्हता आवश्यक आहे, अशा सर्व पदांवर नियुक्त होणा-या माजी सैनिक उमेदवारांना टंकलेखनाची (इंग्रजी/मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या कालावधीत व 2 संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येईल. सदरची नियुक्ती ही मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा नियुक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या कालावधीत व 2 संधीत उत्तीर्ण होण्यासापेक्ष असेल.

ब) महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ 2022/प्र.क्र.84/का-3 दि.07.07.2022 नुसार 'शासन सेवेतील ज्या पदाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये टंकलेखनाची (इंग्रजी/मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट असेल, अशा पदांवर अनाथ उमेदवारांना जर नियुक्ती मिळाली तर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी/मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या कालावधीत 2 संधीत परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येईल. सदरची नियुक्ती ही मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा नियुक्तीच्या दिनांकापासून 2 वर्षाच्या कालावधीत व 2 संधीत उत्तीर्ण होण्यासापेक्ष असेल.

**(4) <u>"निरीक्षक" या पदाकरिता आवश्यक वयोमर्यादा.</u>**

| | |
|---|---|
| **(अ) अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांकरिता** | **- किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षे** |
| **(ब) मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता** | **- किमान 18 वर्षे व कमाल 43 वर्षे** |
| **(क) दिव्यांग प्रवर्गातील उमेदवारांकरिता** | **- किमान 18 वर्षे व कमाल 45 वर्षे** |

| अनु.क्र. | प्रवर्ग | आवश्यक वयोमर्यादा |
|---|---|---|
| 1. | अराखीव (खुल्या) प्रवर्गातील उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही 2015 /प्र.क्र.404/कार्या.12, दि.25.04.2016 मधील तरतूदीनुसार किमान 18 वर्षापेक्षा कमी व कमाल 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| 2. | मागासवर्गीय उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही 2015 /प्र.क्र.404/कार्या.12, दि.25.04.2016 मधील तरतूदीनुसार किमान 18 वर्षापेक्षा कमी व कमाल 43 वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| 3. | माजी सैनिक उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मासैक-2010/ प्र.क्र.279/10/ 16-अ, दि.20.08.2010 मधील तरतूदीनुसार माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील. तसेच, अपंग माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा 45 वर्षेपर्यंत राहील. |
| 4. | प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त उमेवारांसाठी | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.प्रकल्प-1006/ मु.स.396/प्र.क्र.56/06/16-अ,दि.03.02.2007 मधील तरतूदीनुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. सदर वयोमर्यादा सरसकट शिथील केली असल्याने, मागासवर्गीय प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त उमेदवारांनाही कमाल वयोमर्यादेबाबत 45 वर्षापर्यंतची सवलत राहील. |
| 5. | खेळाडू उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रिधो-2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दि.01.07.2016 मधील तरतूदीनुसार, खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी विहीत असलेल्या वयोमर्यादेत 05 वर्षापर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल. तथापि, वयोमर्यादेत 05 वर्षासाठी वयाची अट शिथिल करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा 43 वर्षे राहील. |
| 6. | अंशकालीन पदवीधर (सुशिक्षित बेरोजगार) उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. अशंका 1918/ प्र.क्र.507/16-अ, दि.02.01.2019 मधील तरतूदीनुसार कमाल वयोमर्यादा 55 वर्षे राहील. |
| 7. | दिव्यांग उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-1098/ प्र.क्र.39/98/16-अ, दि.16.06.2001 मधील तरतूदीनुसार उच्चतम वयोमर्यादा सरसकट 45 वर्षे इतकी राहील. |
| 8. | अनाथ उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03 दि.06.04.2023 मधील तरतुदीनुसार अनाथ आरक्षणासाठी अर्ज करणा-या उमेदवारांना अनुसूचित जाती, या प्रवर्गातील उमेदवारांकरिता असलेली 43 वर्षे इतकी कमाल वयोमर्यादा लागू राहील. |
| 9. | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांसाठी | महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.निवक-1010/ प्र.क्र.08/2010/16-अ, दि.06.10.2010 मधील दिलेल्या निर्देशानुसार कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील. सरसकट वयोमर्यादा शिथिल केली असल्याने, या घटकातील मागासवर्गीय उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्षे इतकीच रहील. |

| अनु. क्र. | आरक्षण | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| 1. | अराखीव (खुला) प्रवर्ग उमेदवार | 18 | 38 |
| 2. | मागासवर्गीय उमेदवार | 18 | 43 |
| 3. | माजी सैनिक उमेदवार | सशस्त्र दलात केलेली सेवा + 3 वर्षे<br>कमाल वयोमर्यादा 45 | |
| 4. | माजी सैनिक (दिव्यांग) उमेदवार | 45 | |
| 5. | प्रकल्पग्रस्त उमेदवार | 18 | 45 |
| 6. | भूकंपग्रस्त उमेदवार | 18 | 45 |
| 7. | खेळाडू उमेदवार | 18 | 43 |
| 8. | अंशकालीन पदवीधर (सुशिक्षित बेरोजगार) उमेदवार | 18 | 55 |
| 9. | अनाथ उमेदवार | 18 | 43 |
| 10. | दिव्यांग उमेदवार | 18 | 45 |
| 11. | स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवार | 18 | 45 |

**★ बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या कर्मचा-यांसाठी वयोमर्यादेची अट नाही. तथापि, त्यांनी अर्ज सादर करण्याच्या दिनांकापुर्वीचे खाते प्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.**

**★ तथापि, उन्नत व प्रगत गटात मोडणाऱ्या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, इमाव प्रवर्गामधील उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेले वय,परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत.**

**(5) निवडीचे निकष.**

1. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील करनिर्धारण व संकलन खात्यातील **"निरीक्षक"** पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार विहीत केलेली अर्हता व अटी-शर्ती धारण करीत असलेल्या पात्र उमेदवारांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षा,संगणकावर घेण्यात येईल. सदर परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून विहीत सामाजिक/समांतर आरक्षणानुसार निवडयादी तयार करण्यात येईल.
2. **"निरीक्षक" पदासाठी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेच्या प्रश्नप्रत्रिकेचा दर्जा, पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु, त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इ.12 वी) दर्जाच्या समान राहील. सदर पदाकरिता घेण्यात येणा-या बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल-**

| अ.क्र. | परीक्षेचा विषय | एकूण प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचे माध्यम | कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा व्याकरण | 10 | 20 | मराठी | 120 मिनिटे | परिपत्रक क्र.एमपीआर/1167 दि.27.12.2022 संलग्नित महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक. प्रनिमं1222/ प्र.क्र.54/का.13-अ दि.04.05.2022 मधील तरतूदीनूसार गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या **किमान 45% गुण** प्राप्त करणे आवश्यक राहील. |
| 2 | इंग्रजी भाषा व्याकरण | 10 | 20 | इंग्रजी | | |
| 3 | सामान्य ज्ञान | 15 | 30 | मराठी/इंग्रजी | | |
| 4 | अंकगणित | 15 | 30 | मराठी/इंग्रजी | | |
| 5 | मुं.म.न.पा. अधिनियम, 1888 | 50 | 100 | मराठी/इंग्रजी | | |
| **एकूण** | | **100** | **200** | - | | |

**टिप:-**

★ **सामान्य ज्ञान या विषयाची प्रश्नपत्रिका बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राचा भुगोल, सामाजिक इतिहास, हवामान, स्थानिक वैशिष्ट्ये, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे विविध प्रकल्प (Project), महानगरपालिकेचा अर्थसंकल्प, महानगरपालिका प्राधिकारी (Authorities) यांच्याशी निगडीत प्रश्न अंतर्भूत असतील.**

★ **इंग्रजी व्याकरण या विषयाची ऑनलाईन परीक्षा इंग्रजी भाषेतून घेण्यात येईल तसेच मराठी व्याकरण या विषयाची ऑनलाईन परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल. सामान्य ज्ञान, अंकगणित व मुं.म.न.पा. अधिनियम,1888 वर आधारीत या विषयांची ऑनलाईन परीक्षा मराठी तसेच इंग्रजी भाषेतून परीक्षार्थीच्या सोयीनूसार घेण्यात येईल.**

★ **दि.05.07.2015 च्या मराठी आवृत्तीनुसार व दि.18.01.2016 च्या इंग्रजी आवृत्तीनुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलमांची यादी सोबतच्या परिशिष्ट-1 मध्ये नमूद आहे.**

★ **मौखिक चाचणी घेण्यात येणार नाही.(परि क्र.एमपीएम/2/8371, दि.20.06.2016)**

3. **"निरीक्षक"** पदाची अर्हता धारण करणा-या पात्र उमेदवारांची, बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे, सामाईक गुणवत्ता यादीच्या आधारे रिक्त पदांइतकी कागदपत्रे पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवडयादी तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल. कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. सामाईक गुणवत्ता यादीतील दोन किंवा अधिक उमेदवारांचे गुण समान असल्यास, खालील निकष लागू राहतील :-
   अ) पदवी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांना प्राधान्यक्रम देण्यात येईल.
   आ) उपरोक्त **'अ'** प्रमाणे गुण समान असल्यास,पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकास प्राधान्यक्रम देण्यात येईल.
   इ) उपरोक्त **'अ' व 'आ'** नुसार समान असल्यास, अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास धारण केलेल्या उच्च शैक्षणिक अर्हतेस प्राधान्यक्रम देण्यात येईल.
   ई) उपरोक्त **'अ', 'आ' व 'इ'** नुसार समान असल्यास, **उमेदवाराच्या वयानुसार प्राध्यान्यक्रम देण्यात येईल (वयाने ज्येष्ठ उमेदवाराचा क्रम वरती असेल).**
   उ) उपरोक्त **'अ', 'आ', 'इ' व 'ई'** निकष लागूनही उमेदवारांचा गुणवत्ताक्रम समान येत असल्यास, अशा उमेदवाराचा गुणवत्ताक्रम त्यांच्या **आडनावाच्या अद्याक्षरानुसार** निश्चित करण्यात येईल.

   उपरोक्त निवडीचे निकषानुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास निवडीचे निकष शिथिल करण्याचे अधिकार **मान.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका** यांना राहतील. तसेच शैक्षणिक, व्यावसायिक व इतर कागदपत्रांच्या पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवड यादी तयार करुन, पडताळणीअंती अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

★ एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसांत, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच सत्र 01 ते अंतिम सत्र याबाबत **'सामान्यीकरण प्रक्रिया** (Normalisation Method)' करण्यात येईल, '**सामान्यीकरण प्रक्रियेचे सुत्र (Normalisation Method formula)' व उदाहरण जाहिरातीसोबत जोडण्यात येत आहे.**

**(6) ऑनलाइन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.**

1. अर्ज फक्त ऑनलाइन पध्दतीनेच स्विकारले जातील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
2. ऑनलाइन पध्दतीने करावयाचा अर्ज https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment /Assessment & Collection या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
3. उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळास भेट देऊन जाहिरातीमध्ये नमूद मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करून अर्ज सादर करावा.
4. उमेदवारांच्या मार्गदर्शनार्थ पुढीलप्रमाणे कॉल सेंटर भ्रमणध्वनी क्रमांक: +919513167443 सकाळी 10.00 ते सायंकाळी 05.00 या वेळेत (दुपारी 01.30 ते 02.30 जेवणाची वेळ) सोमवार ते शनिवार उपलब्ध असेल.

5. उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी. तसेच परीक्षा शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरल्यानंतर, ई-पावतीची प्रिंट काढून स्वत:जवळ ठेवावी.

**(7) ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक.**

उमेदवारास ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी 01 महिन्याचा कालावधी उपलब्ध असेल.

| अनु. क्र. | तपशील | दिनांक /वेळ |
|---|---|---|
| 1 | ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी लिंक सुरू होण्याचा दिनांक व वेळ | दि. 20.09.2024<br>वेळ दुपारी 03.00.00 पासून |
| 2 | ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ | दि.19.10.2024<br>वेळ रात्रौ 11.59.59 वाजेपर्यंत |

**(8) ऑनलाइन परिक्षा शुल्क.**

ऑनलाइन परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे आकारले जाईल.

- ✶ अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांकरिता - रु.1000/- (वस्तु व सेवाकरासह)
- ✶ 'मागास प्रवर्गातील' उमेदवारांकरि ता - रु.900/- (वस्तु व सेवाकरासह)
- ✶ अनाथ आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांकरिता - रु.900/- (वस्तु व सेवाकरासह)

1. ऑनलाइन अर्जासोबत ऑनलाइन पद्धतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाइन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. ऑनलाइन परीक्षेच्यावेळी सदर ई-पावतीची छायांकीत प्रत प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे.
2. परीक्षा शुल्क ना परतावा (Non-refundable) आहे.
3. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही.

**(9) दिव्यांग उमेदवारांकरिता सूचना.**

1. **लेखनिक वापरणा-या दिव्यांग व्यक्तींकरिता मार्गदर्शक सूचना :-**

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2, दि. 05.10.2021 मधील निर्देशानुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेसाठी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करुन देण्यात येतील. लेखनिकाची आवश्यकता असल्यास उमेदवाराने स्व:तच्या स्तरावर लेखनिकाची व्यवस्था करणे आवश्यक राहील. दिव्यांगाचा लाभ घेऊ इच्छिणा-या उमेदवाराने निवड प्रक्रियेदरम्यान सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच, दिव्यांग प्रमाणपत्राबाबत महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रवि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 तसेच शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2024/प्र.क्र.86/दि.क.2 दि.27.06.2024 अनुसार, दिव्यांगत्व तपासणी, मुल्यमापन व प्रमाणपत्र वितरणासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

अ) लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि / अथवा उत्तरे लिहीण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास सदर ऑनलाइन परीक्षा देताना, स्वत:च्या लेखनिकाची मदत, खालील नमूद कंडिका क्र.2 व 3 मधील मर्यादांच्या अधिन राहून अनुज्ञेय आहे.

आ) लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवाराने स्वखर्चाने स्वत:साठी लेखनिकाची व्यवस्था स्वत: करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने स्वत: व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच, लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याहीप्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

इ) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. दिव्यांग 2019/ प्र.क्र.200/ दि.क.2 दि.05.10.2021 मधील निर्देशांचे संबंधित उमेदवारांनी तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संकेतां **202110051504462322** असा आहे. सदर शासन निर्णयासोबत संलग्न करण्यात आलेल्या APPENDIX- I व APPENDIX- II च्या विहीत नमून्यातील प्रमाणपत्रांची पुर्तता संबंधित उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज भरतेवेळी पुर्ण करावयाची आहे.

ई) लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवार परिक्षेदरम्यान स्वत:चा लेखनिक वापरत असेल अशावेळी उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व विहीत पात्रता निकषांची पुर्तता केली आहे असे स्वत: उमेदवार आणि लेखनिक दोघांनीही हमी पत्र देणे बंधनकारक आहे. पुढे जर असे निदर्शनास आले की त्याने/तिने वरील कोणतेही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा दडविले आहेत, अशा उमेदवाराचा निकाल विचारात न घेता, त्याचा अर्ज रद्द केला जाईल. मदतनीस कोणत्याही शैक्षणिक शाखेमधील असू शकतो. दिव्यांग उमेदवारास मदतनीस (लेखनीक/वाचक) वापरण्याची परवानगी असल्यास अशा परिस्थितीमध्ये मदतनीस (लेखनीक/वाचक) यांची शैक्षणिक पात्रता, सदर परीक्षेकरिता असलेल्याकिमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी.

उ) लक्षणीय (Benchmark) दिव्यांग उमेदवार प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वाचण्यास आणि/ अथवा उत्तरे लिहिण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यास मदतनीसाची मदत अनुज्ञेय आहे.मदतनीसाने दिव्यांग उमेदवारास केवळ प्रश्न वाचण्यास तसेच उमेदवाराचे उत्तर लिहिण्यास मदत करणे अपेक्षित आहे. मदतनीसाने प्रश्न वाचून दाखविल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहीत ठिकाणी चिन्हांकीत (Marking) करणे अपेक्षित आहे.

ऊ) ऑनलाइन परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, सदर उमेदवाराचे परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर परिक्षकाने परीक्षेनंतर

लेखनिक ऑनलाइन प्रश्नांची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल दिला तर ऑनलाइन परीक्षेच्या निकालात प्राप्त झालेले गुण लक्षात न घेता उमेदवारी रद्द केली जाईल.

2. <u>**चलनवलन विकलांगता व मेंदूचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक तत्वे:-**</u>
लिहिण्यासाठी आवश्यक असणा-या अवयवांवर परिणाम झालेला असेल अशा चलनवलन विषयक दिव्यांगता व मेंदुचा पक्षाघात असलेल्या दिव्यांग उमेदवारांनाच अतिरिक्त वीस (20) मिनीटे प्रती तास वेळेची प्रतिपूर्ती केली जाईल.

3. <u>**क्षीणदृष्टी असलेल्या दिव्यांग उमेदवारांकरिता मार्गदर्शक तत्वे:-**</u>
क्षीणदृष्टी असलेले उमेदवार ऑनलाइन परीक्षेची मोठ्या अक्षरांची स्क्रीन (magnifying font) वापरण्याचा पर्याय निवडू शकतात. अशा उमेदवारांना प्रती तास अतिरिक्त 20 मिनिटे प्रतिपूर्ती वेळ दिला जाईल. जे उमेदवार ऑनलाईन परीक्षेसाठी लेखनिकाची मदत घेतील त्यांना परीक्षा देताना मोठ्या अक्षरांच्या स्क्रीनचा (magnifying font) पर्याय उपलब्ध होणार नाही. वरील मार्गदर्शक **तत्वामध्ये GOI Guidelines/Clarifications मध्ये होणा-या सुधारणांनुसार वेळोवेळी बदल संभवतात.**

4. 40% पेक्षा कमी हालचालीस बाधा आणणारी कमजोरी असलेले/गतिमंद (Locomotor disability/Cerebral palsy) जे लिहू शकतात असे उमेदवार परीक्षेसाठी प्रत्येक तासाला वीस मिनीटे वेळ भरपाई मिळण्यास पात्र असतील. तथापि, त्यांना मदतनीसाचा वापर करता येणार नाही.

5. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.200/दि.क.2 दि.05.10.2021 अन्वये प्राप्त निर्देशानुसार व विशेष सूचनांनुसार, लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर व इतर सर्व तत्सम स्पर्धा परीक्षेप्रमाणे लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध असतील. तसेच,दिव्यांग उमेदवार प्रती तासासाठी अतिरिक्त वीस मिनिटे भरपाई वेळेस पात्र असतील.

★ परिपत्रक क्र.एमबीसी/3976 दि.10.04.2024 संलग्नित शासन निर्णय क्र.दिव्यांग 2019/प्र.क्र.251/दि.क.2 दि.29.02.2024 मधील निर्देशानुसार, Locomotor Disability या अस्थिव्यंग प्रकारामध्ये Spinal Defomity (SD) and Spinal Injury (SI) without any associated neurological/limb dysfunction हा स्वतंत्र उपप्रकार समाविष्ट करण्यात आला आहे.

★ **लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रकि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या <u>www.swavlambancard.gov.in</u> अथवा SADM या संगणकीय वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र तसेच शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2024/प्र.क्र.86/दि.क.2 दि.27.06.2024 अन्वये वैश्विक ओळखपत्र (UDID CARD) सादर करणे अनिवार्य आहे.**

★ **शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40% दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व दिव्यांग प्रवर्गांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/36 दि.21.12.2009 मधील निर्देशांनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविले जाईल व वैद्यकीय मंडळाच्या निर्णयाच्या अनुषंगाने नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.**

## (10) <u>परीक्षा केंद्रांविषयी नियमावली.</u>

1. परीक्षा केंद्राचा पत्ता परीक्षेच्या प्रवेशपत्रात नमूद केला जाईल.
2. संबंधित प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.
3. परीक्षा केंद्र,स्थळ, दिनांक व सत्र इत्यादीबाबत बदल करण्याबाबतची विनंती मान्य केली जाणार नाही.
4. कोणत्याही प्रकारच्या प्रशासकीय व्यवहार्यतेकरीता कोणतेही परीक्षा केंद्र, परीक्षेचे स्थळ, दिनांक व सत्र यामध्ये बदल करण्याचा अधिकार परीक्षा आयोजक संस्था स्वत:कडे राखून ठेवत आहे.
5. उमेदवारांनी स्वत:च्या जबाबदारीवर परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित रहावयाचे आहे. या संबंधात उमेदवारास कोणत्याही स्वरूपातील इजा,दुखापत,हानी किंवा नुकसान झाल्यास, त्यास परीक्षा आयोजक संस्था जबाबदार राहणार नाही.
6. परीक्षेच्यावेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात भ्रमणध्वनी, गणकयंत्र (कॅल्क्युलेटर), आयपॅड तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधणे वापरण्यास सक्त मानाई असेल.
7. प्रवेशपत्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ नमूद करण्यात येईल. परीक्षेचा कालावधी 120 मिनिटांचा असला तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पुर्ण करण्यासाठी जसे की- सूचना देणे, ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे,इत्यादी, बाबींच्या पुर्ततेसाठी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या सुमारे 1 तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या 15 मिनिटे आधी परिक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

## (11) <u>ओळख पटवणे.</u>

परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित होत असताना, उमेदवाराने मूळ प्रवेशपत्रासह [अलिकडील फोटो चिकटवलेले त्याच्या मूळ प्रवेशपत्रावरील नाव व अर्ज नोंदणी प्रक्रियेदरम्यान दिलेले नाव] अलिकडच्या काळातील फोटो ओळखपत्र, म्हणजेच पॅनकार्ड(PAN Card)/पासपोर्ट(Passport)/(कायमस्वरुपी) वाहनचालक परवाना(Permanent Driving License)/मतदार ओळखपत्र(Voter ID)/बँकचे फोटोसह अधिकृत केलेले पासबुक/राजपत्रित अधिका-याने अधिकृत लेटर हेडवर जारी केलेला फोटोसह ओळखीचा पुरावा/स्थानिक नागरी प्रतिनिधीने अधिकृत लेटर हेडवर जारी केलेला फोटोसह ओळखीचा पुरावा/आधारकार्ड/छायाचित्रासह ई-आधारकार्ड/कार्यालयीन ओळखपत्र/छायाचित्रासह बार कौन्सिल ओळखपत्र, यापैकी कोणतेही दोन मूळ कागदपत्रे (छायाप्रतीसह) ओळखीचा पुरावा म्हणून सोबत बाळगणे आवश्यक आहे. तसेच सदर कागदपत्रे पर्यवेक्षकाने मागणी केल्यावर, पडताळणीसाठी पर्यवेक्षकास त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मूळ प्रवेशपत्रावरील माहिती, उपस्थिती अहवाल व सादर करण्यात आलेल्या ओळखीच्या पुराव्यांची सत्यता पर्यवेक्षकांकडून तपासण्यात येईल. उमेदवाराच्या ओळख पटण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास त्याला/तिला परीक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी नाकारण्यात येईल. **(शिधापत्रिका/शिकाऊ वाहन परवाना हे ओळखीचा पुरावा म्हणून वैध असणार नाही.)**

* **<u>टीप:-</u>** परीक्षा केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित होत असताना,उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविण्यासाठी आवश्यक ती मूळ कागदपत्रे (छायाप्रतीसह) मूळ प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी ही बाब लक्षात घ्यावी की, त्यांच्या मूळ प्रवेशपत्रावरील नाव (अर्ज नोंदणी प्रक्रिये दरम्यान दिलेले नाव) हे अलिकडच्या काळातील फोटो असलेले ओळखपत्राशी तंतोतंत जुळले पाहीजे. नाव/ मधले नाव/ आडनाव बदललेल्या विवाहित महिलांनी याची विशेष नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांनी त्यांचे नाव बदलले असेल, त्यांनी मूळ राजपत्र अधिसूचना/मूळ विवाह प्रमाणपत्र त्याच्या छायाप्रतीसह सादर केल्यावरच त्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येईल. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

  सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह ऑनलाइन परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्रे नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

1) परीक्षेसाठीचे वैध प्रवेशपत्र
2) मूळ फोटो ओळखपत्र
3) फोटो ओळखपत्राची छायांकीत प्रत
4) परीक्षा शुल्क ऑनलाइन भरल्याची ई-पावती

**(12) <u>सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method).</u>**

एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसांत, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच सत्र 01 ते अंतिम सत्र याबाबत **'सामान्यीकरण प्रक्रिया** (Normalisation Method)' करण्यात येईल, '**सामान्यीकरण प्रक्रियेचे सुत्र (Normalisation Method formula)' व उदाहरण जाहिरातीसोबत जोडण्यात येत आहे.**

**(13) <u>Groupwise Time Setter</u>.**

बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्रत्येक विषयामधील सोपे, मध्यम व कठीण प्रश्न, गटामध्ये अंतर्भूत करुन त्यानुसार प्रत्येक गटासाठी वेळ निश्चित करुन त्याप्रमाणे परीक्षेमध्ये **''ग्रुप लेवल टायमरची''** अंमलबजावणी करण्यात येईल.

**(14) <u>सर्वसाधारण अटी.</u>**

1. सदर भरती प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे व प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव सदर सरळसेवा भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.
2. सदर भरती प्रक्रियेमध्ये एकूण रिक्त पदांच्या संख्येत संभाव्य रिक्त पदे देखील अंतर्भूत असल्याने उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील.तथापि,तयार करण्यात आलेली निवडयादी कोणत्याही वेळेस पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अथवा निवड यादीचा कालावधी वाढविण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत. यास्तव, उमेदवाराचे नाव निवडयादीत समाविष्ट असले तरीही सदर पदावर त्याचा नियुक्तीकरीता कोणताही अधिकार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.
3. विहित आरक्षणानुसार रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे नेमणूका करण्यात येतील. उमेदवार विहित अर्हता अटी/ शर्ती पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
4. अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखाद्या कर्मचा-याला भरतीकरिता अर्ज करावयाचा असेल तर त्याने / तिने, त्याच्या / तिच्या खातेप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र, अर्ज सादर करण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. सदर ना-हरकत प्रमाणपत्र/ चौकशी प्रमाणपत्र प्रत्यक्ष नियुक्ती पूर्वी, नियुक्ती प्राधिका-यांना सादर करणे आवश्यक राहील.
5. उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) सुस्पष्ट व पूर्ण असावा.
6. इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही.
7. **उमेदवाराने अर्जासोबत खालील नमुद केलेली शैक्षणिक, व्यवसायिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या मूळ प्रती तसेच त्यांच्या साक्षांकित प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे:-**

   अ) उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, अर्हतेमध्ये नमुद केलेले विहित शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्र, मराठी व इंग्रजी भाषेचे विहित गतीचे टंकलेखनाचे प्रमाणपत्र व संगणक ज्ञानाचे एमएससीआयटी प्रमाणपत्र तसेच मागासवर्ग उमेदवारांनी सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, आणि अ.जा. व अ.ज. प्रवर्ग वगळता अन्य सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, इत्यादी सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती, तसेच उमेदवाराची समांतर आरक्षणांतर्गत निवड झाली असल्यास, शासन निर्णयानुसार विहित प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक असेल.

   आ) उमेदवारांच्या नावात बदल झाल्याबाबत राजपत्र व विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच राजपत्राची प्रत सादर करावी, ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.

   इ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.राआधो 4019/प्र.क्र.31/16-अ दि.31.05.2021 मधील निर्देशांनुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेचे वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्राची वैधता, ऑनलाइन अर्ज नोंदणी केल्याच्या कालावधीपासून निवड प्रक्रिया चालू असतानाच्या कालावधीतील असावी.

   ई) सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील अर्ज करणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.बीसीसी-2024/प्र.क्र.75/आरक्षण-5 दि.28.06.2024 मधील निर्देशांनुसार सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्तृत भरती प्रक्रियेअंतर्गत निरीक्षक पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांची महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.संकीर्ण-2024/प्र.क्र.79/आरक्षण-5 दि.19.04.2024 मधील निर्देशांनुसार प्रलंबित असलेल्या न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून नियुक्ती करण्यात येईल.

उ) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/42 दि.01.06.2023 सोबतचा महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र.महिआ2023/प्र.क्र.123/कार्या-2 दि.04.05.2023 मधील निर्देशांनुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता, खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आलेली आहे. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled)असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतूदी लागू राहतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत नियुक्तीच्या वेळी सदर प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र पडताळणीबाबत, महाराष्ट्र शासन, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2021/प्र.क्र.297/मावक दि.26.04.2022 मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल. सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवाराच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी संबंधित प्राधिकरणाकडून केल्यानंतर नियुक्ती करण्यात येईल.

ऊ) महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेला अंतिम दिनांक इत्यादी तपशीलासह अर्ज, आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना सादर करुन त्यांचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

ऋ) महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-2022/प्र.क्र.122/का-03 दि.06.04.2023 सम क्रमांकाचे शासन पूरक पत्र दि.10.05.2023 मधील निर्देशानुसार अनाथांची पदे भरण्यात येतील. प्रस्तृत पदासाठी अर्ज करताना अनाथ आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी सदर शासन निर्णय व शासन पूरक पत्रात विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार, संस्थात्मक प्रवर्गातील तसेच संस्थाबाह्य प्रवर्गातील अनाथांसाठी प्रमाणपत्र निर्गमित करावयाची कार्यपध्दतीचा अवलंब करुन, सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. अनाथ आरक्षणाच्या माध्यमातून अनाथांच्या 'संस्थात्मक' प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणपत्र उपलब्ध होऊ शकले नाहीत तरी ती पदे अनाथांच्या 'संस्थाबाह्य' प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

ऌ) फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड आवश्यक आहे.

8. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशिल देणे आवश्यक आहे.
9. पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी संबधित पोलिस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिद्ध झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नियुक्ती केली जाईल.
10. उमेदवाराकडून प्राप्त झालेल्या चारित्र्य व पूर्वचारित्र्य प्रमाणपत्रातील दिनांकापासून ते सदर उमेदवारास सेवेत प्रत्यक्ष नियुक्ती देण्याच्या दिनांकाच्या कालावधीतील उमेदवाराची चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करण्यात येईल. सदर कालावधीत उमेदवाराविरूद्ध कोणत्याही प्रकारचा गुन्हा आढळून आल्यास, सदर उमेदवाराचे नियुक्तीपत्र रद्दबादल करून, भारतीय दंडसंहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येईल.
11. पात्र ठरलेल्या उमेदवारांची एकत्रित सामायिक गुणवत्ता यादी तयार करुन, सदर गुणवत्ता यादीमधील उच्च गुणवत्ताधारक मागासवर्गीय उमेदवारांचा खुला प्रवर्गाच्या पदाकरिता विचार करण्यात येईल.
12. निरीक्षक पदाकरीता घेण्यात येणा-या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची, निवडीच्या निकषांनुसार, गुणवत्ता,सामाजिक व समांतर आरक्षणानुसार तात्पुरती/अंतिम निवडयादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या **https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment/Assessment & Collection** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर निवडयादी उमेदवाराच्या मूळ शैक्षणिक व इतर अनुषांगिक प्रमाणपत्रांच्या पडताळणीसापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक प्रमाणपत्रे विहित कालावधीत पडताळणीकरिता सादर न केल्यास त्याचे नाव निवडयादीतून रद्द करण्यात येईल.
13. अंतिम निवड यादी जाहीर करण्यात आल्यानंतर अंतिम निवड यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या उमेदवारांचा पुर्नमुल्यांकन तसेच निवड यादी संबंधी कोणताही अर्ज किंवा तक्रार खात्याद्वारे विचारात घेतली जाणार नाही.
14. उमेदवाराची मूळ कागदपत्रे पडताळणी करुन ती विहित अटी व शर्तीनुसार यथायोग्य असल्यास नेमणूक करण्यात येईल. तथापि, नेमणूकीच्या कार्यवाही दरम्यान उमेदवार निवडीच्या विहीत अर्हता पूर्ण करीत नाही असे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर लक्षात आल्यास त्याची नेमणूक रद्द करण्यात येईल.
15. उमेदवारांची नियुक्ती गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षण, रिक्त पदांची उपलब्धता, निवडयादीची विधीग्राह्यता, इ. बाबी विचारात घेऊन करण्यात येईल.
16. "निरीक्षक" संवर्गाच्या रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार निवडयादी तयार करुन आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. तथापि, भरती प्रक्रिया तसेच निवडयादी कोणत्याहीवेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार **आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका** यांना आहेत.

17. काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाइन परीक्षेच्या तारखांमध्ये बदल करावा लागल्यास, त्याबाबतची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/for prospects/careers-All/Recruitment/Assessment & Collection या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
18. या भरतीप्रक्रिया संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरील संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदर संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावे. याबाबत लेखी स्वरुपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही.
19. रिक्त पदांइतकी कागदपत्रे पडताळणीसापेक्ष तात्पुरती निवडयादी तयार करुन प्रसिध्द करण्यात येईल. कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. निवडसूची प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून 01 वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत त्यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील.त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. निवड यादीच्या विधीग्राह्यतेच्या कालावधीमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.
20. जर एखाद्या उमेदवाराने नियुक्तीवेळी "निरीक्षक" पद स्वीकारण्यास कोणत्याही कारणाने नकार दिल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव सदर पदावर काम करण्यास नकार दिल्यास, त्याची सदर पदावरील निवड रद्दबातल होईल.
21. निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (शिस्त व अपील) नियम 2015 लागू होतील.
22. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू होईल. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना [म्हणजेच मुंबई महानगरपालिका निवृत्तीवेतन नियम 1953 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना] त्यांना लागू होणार नाही.
23. सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवासातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधिन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.
24. निवड झालेल्या उमेदवाराची सदर पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 01 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम, 'सुरक्षा अनामत रक्कम' म्हणून उमेदवारास भरावी लागेल किंवा तशा आशयाचे क्षतीपूर्ती बंधपत्र सादर करावे लागेल. सदर 'सुरक्षा अनामत रक्कम' परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर, उमेदवारास बिनव्याजी परत मिळेल. उमेदवाराने 'सुरक्षा अनामत रक्कम' भरल्यानंतर, महानगरपालिकेतील नेमणुक न स्विकारल्यास किंवा परिविक्षाधीन कालावधीत नोकरी सोडल्यास / राजीनामा दिल्यास तसेच काही कारणास्तव सेवा समाप्त / बडतर्फ केल्यास त्यांना सदर 'सुरक्षा अनामत रक्कम' परत मिळण्याचा हक्क राहणार नाही.
25. निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही विभागात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदलीयोग्य असेल.
26. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क./1064/2011/16-ब दि.12.12.2011 मधील निर्देशानुसार सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवाराकडे नियुक्तीचेवेळी जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, संबंधित उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी, नियुक्तीनंतर 01 महिन्याच्या आत सदर कर्मचा-याने संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे दावा सादर करुन, त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिका-यांना सादर करणे आवश्यक असेल. परंतु, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर उमेदवारास दिलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल.
27. उमेदवारांना परीक्षेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
28. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे.
29. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, दि. 28.03.2005 रोजीची अधिसूचना व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 2005 च्या अंमलबजावणीबाबत, शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही 2000/प्र.क्र.17/2000/12 दि.01.07.2005 मधील निर्देशांनुसार लहान कुटुंब असल्याबाबत विहित नमून्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे. **(अविवाहित अर्जदारानेसुध्दा सदरचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक असून, त्यामध्ये त्याने/तिने लागू नाही असा शेरा नमूद करावा)**
30. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महानगरपालिकेचे निवासस्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवासस्थान देण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
31. निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार **आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका** यांना राहतील.
32. अराखीव (खुला) पदांकरिता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्ग उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने, सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.
33. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मागासवर्ग कक्षाचे परिपत्रक क्र.एमबीसी/6257 दि.20.01.2020 अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अथवा वर्ग करण्याची कार्यवाही चालू असलेल्या कर्मचा-यांचे तसेच, मुळ नियुक्ती अ.ज. प्रवर्गातून झालेल्या मागासवर्गीय कर्मचा-यांनी अद्याप अ.ज. प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास आणि/अथवा अ.ज. प्रवर्गातून नियुक्तीनंतर विशेष मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केलेल्या कर्मचा-यांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
34. निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय परिक्षकांकडे पाठविण्यात येईल. तसेच, दिव्यांग अरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय तपासणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे पाठविण्यात येईल. वैद्यकीय मंडळाच्या अहवालानुसार, उमेदवाराच्या नियुक्तीची कार्यवाही करण्यात

येईल. 40% व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या उमेदवारांचाच अपंग आरक्षणांतर्गत नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल. लक्षणीय दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र.अप्रकि-2018/प्र.क्र.46/आरोग्य-6 दि.14.09.2018 मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र तसेच शासन परिपत्रक क्र.दिव्यांग-2024/प्र.क्र.86/दि.क.2 दि.27.06.2024 अन्वये वैश्विक ओळखपत्र (UDID CARD) सादर करणे अनिवार्य आहे.

35. उन्नत व प्रगत गटांमध्ये ( Creamy Layer) मोडणारे वि.जा.- अ, भ.ज.- ब, भ.ज.- क, भ.ज.- ड, विमाप्र, इमाव प्रवर्गामधील उमेदवार, मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत.

★ **विशेष सूचना :-**

1. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी, अन्य प्रकारे सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तिला किंवा इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची नोंद घ्यावी.
2. एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्पावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.
3. मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याची सूचना उमेदवारांना देण्यात येत आहे.
4. सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांना देखील या जाहिरातीत देण्यात आलेल्या निर्देशांनुसार ऑनलाइन पध्दतीने अर्ज सादर करावा.
5. **"निरीक्षक"** या संवर्गातील सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांकरिता घेण्यात येणारी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाइन परीक्षा, महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रातील मुंबई शहरासह महाराष्ट्र राज्याच्या इतर शहरांमध्ये घेण्यात येईल.
6. परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या उद्भवल्यास त्याचा परिणाम ऑनलाइन परीक्षेवर किंवा निकालावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये परीक्षेस होणारा विलंब, उमेदवारांवर होणारा परिणाम, तसेच उमेदवारांना पुन्हा परीक्षा देण्यास लागू नये यासह सर्व बाबींचे निराकरण करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न परीक्षा आयोजित करणा-या संस्थेद्वारा करण्यात येईल. तथापि, अशा परिस्थितीमध्ये जे उमेदवार सहकार्य करण्यास इच्छुक नसतील अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेमधून पुर्णत: वगळण्यात येईल.
7. भरतीप्रक्रियेशी संबंधित सर्व बाबींबाबत महानगरपालिकेचा निर्णय हा अंतिम राहील. तसेच तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील. याबाबत केल्या जाणा-या विचारणा व पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.
8. ऑनलाइन परीक्षेदरम्यान परीक्षा केंद्रांची क्षमता कमी असल्यास किंवा काही तांत्रिक समस्या निर्माण झाल्यास एकापेक्षा जास्त सत्रामध्ये परीक्षा घेतल्या जातील.
9. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्पावर उमेदवाराने चुकीची माहिती दिली किंवा भरतीप्रक्रियेचे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याला / तिला निवड प्रक्रियेदरम्यान अपात्र ठरविण्यात येऊन भविष्यात संस्थेच्या (बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या) कोणत्याही भरतीप्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच सदर बाब भरतीप्रक्रियेनंतर निदर्शनास आल्यास पुर्वलक्षी प्रभावाने उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
10. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुद्ध व पारदर्शक पद्धतीने गुणवत्तेच्या आधारे पाडली जाणार आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये.

उमेदवारांनी उपरोक्त जाहिरातीचे संपुर्ण अवलोकन करुन, विहीत मुदतीत पुढे नमूद केलेल्या संकेतस्तथळावर अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

सही/- दि.16.09.2024

**करनिर्धारक व संकलक (प्र.)**

**★परिशिष्ट-१★**

**जाहिरातीमधील मुद्दा क्र.५ मधील टिप मध्ये नमूद केलेल्या मु.म.न.पा. अधिनियम, १८८८ च्या कलमांची यादी. (मराठी मध्ये)**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ व्याख्या, निवडणूक, प्रकरण-८; महानगरपालिका प्राधिकारी, अधिकार (Authorities Powers etc.) (दि.०५.०७.२०१५ च्या आवृत्तीनुसार):-**

- कलम ३- संज्ञाच्या व्याख्या (प-१६ ते प-२२ ),
- कलम ४- नगरपालिका प्राधिकारी (प-२२),
- कलम ५- महानगरपालिकेची रचना (प-२२),
- कलम ६ ते ३४- निवडणुक, (प-२४ ते ५३)
- कलम ६१- महानगरपालिकेने तरतूद करावयाच्या बाबी. (प-८९ ते ९०)
- कलम ६३- महानगरपालिकेस स्वविवेकानुसार तरतूद करता येईल अशा गोष्टी (प-९३ ते ९५)
- कलम १२८- महानगरपालिकेच्या करांचे आणि भाड्यांचे व आकारांचे दर निश्चित करणे. (प-१९३)
- कलम १२९- अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या अंगीकारणे. (प-१९३ ते प-१९४)
- कलम १३९ ते २१९- प्रकरण ८ महानगरपालिका कराधान, (कलम १९२ ते कलम १९५ वगळून) (प-१९९ ते २५०)
- कलम ३५०- इमारतींची उभारणी किवा त्यात फेरफार वगैरे चालू असता त्यांचे निरिक्षण करणे. (प-३२७)
- कलम ४८३- नोटीसा वगैरे कोणी बजावणे किवा सादर करणे.(प-४७५)
- कलम ४८४- परिवास्तूच्या मालकावर व इतर व्यक्तीवर नोटीस कशी बजावावयाची. (प-४७५ ते प-४७६)
- कलम ४८५- परिवास्तूच्या मालकावर किवा भोगवटादारावर नोटीस कशी बजावावयाची.(प-४७६)
- कलम ४८५अ- परिवास्तुच्या मालकीसंबंधी माहिती मागवण्याचा आयुक्तांचा अधिकार. (प-४७७)
- कलम ४८६अ- करांची बिले डाकेने बजावणे. (प-४७७)
- कलम ४८७- नोटीसा, वगैरेवर सहीचा शिक्का मारता येईल. (प-४७८)
- कलम ४८८- आयुक्त वगैरेस निरिक्षण किवा सर्वेक्षण करण्याकरिता किवा आवश्यक वगैरेस कामे पार पाडण्याकरिता कोणत्याही परिवास्तूत प्रवेश करण्याचा अधिकार असणे. (प-४७८ ते प-४७९)
- कलम ४९१- वसुलीयोग्य असलेला खर्च मागणीवरुन देय असणे, आणि मागणीवरुन तो न दिल्यास तो मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येणे.(प-४८२ ते प-४८३)
- कलम ४९८- कलम ४९३ व ४९५ याखाली येणे असलेल्या हप्त्यांची वसूली. (प-४८५)
- कलम ५१७- दिवाणी व फौजदारी कार्यवाही दाखल करणे व त्याबाबत तडजोड करणे. (प-४९४ ते प-४९६)
- कलम ५१७(१)(डी)- कलम २१७ खाली येणारे करयोग्य मूल्य किंवा भांडवली मूल्य किंवा कर याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपीलाच्या कामात प्रतिवाद करणे, अपिल दाखल करुन घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे. (प-४९४)
- कलम ५२०(क)- राज्य शासनाचा अनुदेश किवा निदेश देण्याचा अधिकार. (प-५००)
- कलम ५२३- अवधी संगणित करणे(प-५०२ ते प-५०३)
- कलम ५२५(१)- निर्धारण, वगैरे करण्यात उपचार दोष घडल्यास किवा प्रमाद घडल्यास त्यामुळे अशी निर्धारणे वगैरे विधीअग्राह्य ठरतात असे न मानणे. (प-५०३)

सही/- दि.16.09.2024

**करनिर्धारक व संकलक (प्र.)**

★परिशिष्ट-१★

जाहिरातीमधील मुद्दा क्र.५ मधील टिप मध्ये नमूद केलेल्या मु.म.न.पा. अधिनियम, १८८८ च्या कलमांची यादी. (इंग्रजी मध्ये)

**Mumbai Municipal Corporation Act, 1888 - Definations, Elections, Chapter-8 ; Municipal Authorities, Powers etc. (As per edition dated 18.01.2016):-**

- ❖ Section 3 - Definitions of terms (P.No.-12 ते P.No.-16),
- ❖ Section 4 - Municipal Authorities (P.No.- 16 to P.No.-17),
- ❖ Section 5 - Composition of Corporation (P.No.-17 to P.No.-19),
- ❖ Section 6 to 34 – Election (P.No.-19 ते P.No.-41)
- ❖ Section 61 - Matters to be provided for by The Corporation. (P.No.-75 ते P.No.-76)
- ❖ Section 63 – Matters which may be provided for by the Corporation at their discretion. (P.No.-79 ते P.No.-80)
- ❖ Section 128 – Fixing rates of Municipal Taxes and of fares and charges of (Brihamumbai Electric Supply and Transport undertaking) (P.No.-163)
- ❖ Section 129 – Final adoption of Budget estimates. (P.No.-163 ते P.No.-164)
- ❖ Section 139 to 219 - Chapter 8 Municipal Taxation (excluding Section 192 to 195) (P.No.-169 ते P.No.-196) & (P.No.-203 ते P.No.-214)
- ❖ Section 350 - Inspection of buildings in course of erection, alternation etc. (P.No.-272)
- ❖ Section 483 - Notice, etc by whom to be served or presented (P.No.-390)
- ❖ Section 484 - Service how to be effected on owners of premises and other persons. (P.No.-390 to P.No.-391)
- ❖ Section 485 – Service on owner or occupier of premises how to be effected (P.No.- 391)
- ❖ Section 485A - Power of commissioner to call for the Information as to ownership of premises. (P.No.- 391)
- ❖ Section 486A – Service of bill for taxes by post. (P.No.- 392)
- ❖ Section 487 – Signature on notice , etc., may be stamped (P.No.- 392)
- ❖ Section 488 – Commissioner, etc., may enter any premises for purpose of inspection, survey or execution of necessary work. (P.No.- 392)
- ❖ Section 491 – Expenses recoverable under this Act to be payable on demand; and if not paid on demand maybe recovered as an arrear of property tax. (P.No.- 394)
- ❖ Section 498 – Recovery of installments due under sections 493 & 495. (P.No.- 396)
- ❖ Section 517 – Provisions respecting institution etc., of civil and criminal actions and obtaining legal advice. (P.No.- 404)
- ❖ Section 517(1)(d) - defend, admit or compromise any appeal against a rateable value [or the capital value as the case may be] or tax brought under section 217 (P.No.- 404)
- ❖ Section 520(c) – Power of State Government to issue instructions or directions. (P.No.- 408)
- ❖ Section 523 – Computation of time (P.No.- 410 ते P.No.- 411)
- ❖ Section 525(1) – Informalities and errors in assessments etc. not to be deemed to invalidate such assessment etc. (P.No.- 411)

सही/- दि.16.09.2024

**करनिर्धारक व संकलक (प्र.)**

## About Normalization

Normalization means adjusting values measured on different scales to a notionally common scale.

## Need for Normalization in Exam

Exam pertaining for a particular post/course could be spread across multiple shifts which will have different question paper for each shift. The normalization is to be done by considering the difficulty level of each set, since the questions may be different in different sets and difficulty level of a particular set may be different from other sets.

Hence the normalization of scores need to be carried out for all the candidates who had written the exam, across shifts for the same post/course

## Mean Standard Deviation Method

$$\widehat{M}_{ij} = \frac{\overline{M}_t^g - M_q^g}{\overline{M}_{ti} - M_{iq}} \left(M_{ij} - M_{iq}\right) + M_q^{gm}$$

$\widehat{M}_{ij}$ = Normalized marks of j^th candidate in the i^th shift.

$\overline{M}_t^g$ = is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (No. of candidates will be rounded-up)

$M_q^g$ = is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the paper considering all shifts.

$\overline{M}_{ti}$ = is the average marks of the top 0.1% of the candidates in the i^th shift (No. of candidates will be rounded-up)

$M_{iq}$ = is the sum of mean marks and standard deviation of the i^th shift

$M_{ij}$ = is the actual marks obtained by the j^th candidate in i^th shift.

$M_q^{gm}$ = is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

Calculation of marks will be done up to 5 decimal places.

**Example: Suppose a test was held in 10 shifts of examinees as per details given below: - (Allocation of Days and shifts were done randomly)**

**Distribution of candidates were as follows:**

| Date_Shift | Subject | Total Marks | Total Appeared Count |
|---|---|---|---|
| 12 Mar 2019 S1 | XYZ | 671985.75 | 10100 |
| 12 Mar 2019 S2 | XYZ | 698285 | 9980 |
| 13 Mar 2019 S1 | XYZ | 528957 | 8000 |
| 13 Mar 2019 S2 | XYZ | 705548 | 10100 |
| 14 Mar 2019 S1 | XYZ | 631390.5 | 8500 |
| 14 Mar 2019 S2 | XYZ | 669616.25 | 9750 |
| 15 Mar 2019 S1 | XYZ | 655625 | 9280 |
| 15 Mar 2019 S2 | XYZ | 898089.25 | 12210 |
| 16 Mar 2019 S1 | XYZ | 721822.5 | 9820 |
| 16 Mar 2019 S2 | XYZ | 594888 | 8185 |

## STEP-BY-STEP PROCEDURE FOR NORMALIZATION AND PREPARATION OF NORMALIZED SCORE:

1. Calculate the mean and standard deviation marks of the candidates of each shift individually.
2. Calculate the mean and standard deviation marks of the candidates in the subject considering all shifts.
3. Calculate the Average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (No. of candidates will be rounded up)
4. Calculate the Average marks of the top 0.1% of the candidates in each shift (No. of candidates will be rounded-up)
5. Below table shows the calculation of mean and standard deviation for each shift and for overall exam.

| Date_Shift | Subject | Total Marks | Total Candidate Count | Shift Wise Average | Shift Wise StandardDeviation | CandidateCountTakenFor Calculation | AvgofToppersSHiftWIse | overallAvg of All Present Candidates | overallstd of All Present Candidates | 0.1% of Overall AvgOfToppers of All Shifts | mgt | mgq | mti | miq | mgqm |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 Mar 2019 S1 | XYZ | 671985.75 | 10100 | 66.53324 | 29.51553 | 11 | 158.90909 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 158.90909 | 96.04877 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S2 | XYZ | 698285 | 9980 | 69.96844 | 29.94262 | 10 | 156.8 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 156.8 | 99.91106 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S1 | XYZ | 528957 | 8000 | 66.11962 | 28.0943 | 8 | 153.8125 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 153.8125 | 94.21392 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S2 | XYZ | 705548 | 10100 | 69.85624 | 28.20621 | 11 | 157.15909 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 157.15909 | 98.06245 | 104.23555 |
| 14 Mar 2019 S1 | XYZ | 631390.5 | 8500 | 74.28124 | 32.96905 | 9 | 164.25 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 164.25 | 107.25029 | 104.23555 |
| 14 Mar 2019 S2 | XYZ | 669616.25 | 9750 | 68.67859 | 30.83717 | 10 | 157.2 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 157.2 | 99.51576 | 104.23555 |
| 15 Mar 2019 S1 | XYZ | 655625 | 9280 | 70.64925 | 29.4165 | 10 | 155.225 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 155.225 | 100.06575 | 104.23555 |
| 15 Mar 2019 S2 | XYZ | 898089.25 | 12210 | 73.55358 | 29.87423 | 13 | 159.59615 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 159.59615 | 103.42781 | 104.23555 |
| 16 Mar 2019 S1 | XYZ | 721822.5 | 9820 | 73.50535 | 28.98783 | 10 | 160.3 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 160.3 | 102.49318 | 104.23555 |
| 16 Mar 2019 S2 | XYZ | 594888 | 8185 | 72.68027 | 30.41292 | 9 | 155.36111 | 70.64068 | 29.95431 | 158.76042 | 158.76042 | 100.59499 | 155.36111 | 103.09319 | 104.23555 |

| | |
|---|---|
| Total candidates count | 95925 |
| 0.1% of Overall Avg of Toppers | 96 |
| Avg of Toppers | 158.76042 |

Based on the above data points, the Mean Standard Deviation formula is applied as shown in the below sample. Column F shows the formula applied.

| A | B | C | D | E | F | G | H | I | J | K | L |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Date_shift | ParticipantID | Score | Subject | Normalized_Score | Normalized_Score_WithFormula | mgt | mgq | mti | miq | mij | mgqm |
| 12 Mar 2019 S1 | 8336 | 167.5 | XYZ | 170.35026 | =ROUND(((((G2-H2)/(I2-J2))*(K2-J2))+L2),5) | 158.76042 | 100.59499 | 158.90909 | 96.04877 | 167.5 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S1 | 698 | 163 | XYZ | 166.18635 | =ROUND(((((G3-H3)/(I3-J3))*(K3-J3))+L3),5) | 158.76042 | 100.59499 | 158.90909 | 96.04877 | 163 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S1 | 4213 | 161.75 | XYZ | 165.02971 | =ROUND(((((G4-H4)/(I4-J4))*(K4-J4))+L4),5) | 158.76042 | 100.59499 | 158.90909 | 96.04877 | 161.75 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S1 | 3187 | 161.5 | XYZ | 164.79838 | =ROUND(((((G5-H5)/(I5-J5))*(K5-J5))+L5),5) | 158.76042 | 100.59499 | 158.90909 | 96.04877 | 161.5 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S1 | 9194 | 159.5 | XYZ | 162.94776 | =ROUND(((((G6-H6)/(I6-J6))*(K6-J6))+L6),5) | 158.76042 | 100.59499 | 158.90909 | 96.04877 | 159.5 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S2 | 15471 | 163.5 | XYZ | 169.25132 | =ROUND(((((G7-H7)/(I7-J7))*(K7-J7))+L7),5) | 158.76042 | 100.59499 | 156.8 | 99.91106 | 163.5 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S2 | 13959 | 157.5 | XYZ | 163.11669 | =ROUND(((((G8-H8)/(I8-J8))*(K8-J8))+L8),5) | 158.76042 | 100.59499 | 156.8 | 99.91106 | 157.5 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S2 | 14619 | 157.5 | XYZ | 163.11669 | =ROUND(((((G9-H9)/(I9-J9))*(K9-J9))+L9),5) | 158.76042 | 100.59499 | 156.8 | 99.91106 | 157.5 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S2 | 14928 | 157 | XYZ | 162.60547 | =ROUND(((((G10-H10)/(I10-J10))*(K10-J10))+L10),5) | 158.76042 | 100.59499 | 156.8 | 99.91106 | 157 | 104.23555 |
| 12 Mar 2019 S2 | 12458 | 156.75 | XYZ | 162.34986 | =ROUND(((((G11-H11)/(I11-J11))*(K11-J11))+L11),5) | 158.76042 | 100.59499 | 156.8 | 99.91106 | 156.75 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S1 | 22650 | 160.75 | XYZ | 169.17166 | =ROUND(((((G12-H12)/(I12-J12))*(K12-J12))+L12),5) | 158.76042 | 100.59499 | 153.8125 | 94.21392 | 160.75 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S1 | 25388 | 160 | XYZ | 168.43969 | =ROUND(((((G13-H13)/(I13-J13))*(K13-J13))+L13),5) | 158.76042 | 100.59499 | 153.8125 | 94.21392 | 160 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S1 | 22780 | 156.25 | XYZ | 164.77987 | =ROUND(((((G14-H14)/(I14-J14))*(K14-J14))+L14),5) | 158.76042 | 100.59499 | 153.8125 | 94.21392 | 156.25 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S1 | 21763 | 152 | XYZ | 160.63206 | =ROUND(((((G15-H15)/(I15-J15))*(K15-J15))+L15),5) | 158.76042 | 100.59499 | 153.8125 | 94.21392 | 152 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S1 | 22947 | 151.25 | XYZ | 159.9001 | =ROUND(((((G16-H16)/(I16-J16))*(K16-J16))+L16),5) | 158.76042 | 100.59499 | 153.8125 | 94.21392 | 151.25 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S2 | 30268 | 169 | XYZ | 174.05531 | =ROUND(((((G17-H17)/(I17-J17))*(K17-J17))+L17),5) | 158.76042 | 100.59499 | 157.15909 | 98.06245 | 169 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S2 | 31233 | 163 | XYZ | 168.14985 | =ROUND(((((G18-H18)/(I18-J18))*(K18-J18))+L18),5) | 158.76042 | 100.59499 | 157.15909 | 98.06245 | 163 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S2 | 29837 | 159.25 | XYZ | 164.45894 | =ROUND(((((G19-H19)/(I19-J19))*(K19-J19))+L19),5) | 158.76042 | 100.59499 | 157.15909 | 98.06245 | 159.25 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S2 | 33235 | 159 | XYZ | 164.21288 | =ROUND(((((G20-H20)/(I20-J20))*(K20-J20))+L20),5) | 158.76042 | 100.59499 | 157.15909 | 98.06245 | 159 | 104.23555 |
| 13 Mar 2019 S2 | 29778 | 155.75 | XYZ | 161.01409 | =ROUND(((((G21-H21)/(I21-J21))*(K21-J21))+L21),5) | 158.76042 | 100.59499 | 157.15909 | 98.06245 | 155.75 | 104.23555 |

Once the Normalized scores are calculated using the Mean Standard Deviation formula for all the shifts, the database is then merged and sorted on the Normalized scores for further preparation of result

# Introduction of mandatory time-bound sections in MCQ based examinations-reg.

## विषय: MCQ आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य कालमर्यादित विभागांचा समावेश करणे.

1. **BMC** has decided to introduce mandatory time-bound sections in all its MCQ-based examinations which are conducted on a computer-based platform. This measure has been implemented to enhance the security and sanctity of the exams in light of emerging threats during the examination process.

1. **BMC** ने संगणक-आधारित प्लॅटफॉर्मवर आयोजित केलेल्या सर्व MCQ-आधारित परीक्षांमध्ये अनिवार्य कालमर्यादित विभाग लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षा प्रक्रियेदरम्यान उद्भवणा-या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर परीक्षेची सुरक्षा आणि महत्त्व वाढवण्यासाठी हा उपाय लागू करण्यात आला आहे.

2. The question paper in these examinations will be divided into multiple time bound groups. For example, in BMC-A&C Inspector Exam, if there are four time-bound sections (A, B, C & D) in the question paper, each section will have 25 questions and 30 minutes of time allotted. Candidates will be restricted from proceeding to the next section until they complete the allotted time for the previous section. Additionally, candidates will not be allowed to review the questions or modify their responses for a group after the completion of its allotted time. The questions for the next section will start automatically after the completion of the allotted time for the previous section.

2. या परीक्षांमधील प्रश्नपत्रिका विविध कालमर्यादित गटांमध्ये विभागल्या जातील. उदाहरणार्थ, BMC-A&C Inspector परीक्षेत, प्रश्नपत्रिकेत चार कालमर्यादित विभाग (A, B, C व D) असल्यास, प्रत्येक विभागात 25 प्रश्न असतील आणि 30 मिनिटांचा वेळ दिला जाईल. आधीच्या विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण केल्याशिवाय उमेदवारांना पुढील विभागात जाता येणार नाही. याव्यतिरिक्त, उमेदवारांना दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर त्या गटातील प्रश्नांचे पुनरावलोकन करण्याची किंवा त्यांच्या प्रतिसादात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. आधीच्या विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर पुढील विभागातील प्रश्न आपोआप सुरू होतील.

3. Candidates are given the option to mark any question, whether attempted or not, for review. This means that candidates can go through these marked questions in a section again before the allotted time for that section ends. It is important to note that questions marked for review will be evaluated.

3. उमेदवारांनी प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला असो वा नसो असा कोणताही प्रश्न पुनरावलोकनासाठी चिन्हांकित करण्याचा पर्याय दिला जातो. याचा अर्थ असा की उमेदवारांनी चिन्हांकित केलेले प्रश्न हे त्या विभागासाठी दिलेली वेळ संपण्यापूर्वी उमेदवार पुन्हा पाहू शकतात. पुनरावलोकनासाठी चिन्हांकित केलेल्या प्रश्नांचे मूल्यांकन केले जाईल हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

| **Pattern of Examination and related instructions / परीक्षेचे स्वरूप व संबंधित सूचना** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| **Sr. No.** | **Subject Name / विषयाचे नाव** | **Group Name** | | | |
| | | **Group A** | **Group B** | **Group C** | **Group D** |
| 1 | Marathi Grammar / मराठी व्याकरण | 2 Questions | 2 Questions | 3 Questions | 3 Questions |
| 2 | English Grammar / इंग्रजी व्याकरण | 3 Questions | 3 Questions | 2 Questions | 2 Questions |
| 3 | General knowledge / सामान्यज्ञान | 4 Questions | 4 Questions | 4 Questions | 3 Questions |
| 4 | Arithmetic / अंकगणित | 3 Questions | 4 Questions | 4 Questions | 4 Questions |
| 5 | BMC ACT,1888 / मुं.म.न.पा. अधिनियम, 1888 | 13 Questions | 12 Questions | 12 Questions | 13 Questions |
| **Number of Questions / प्रश्नांची संख्या – Total 100 Questions** | | **25 Questions** | **25 Questions** | **25 Questions** | **25 Questions** |
| **Group Wise Timing / विभागानुसार वेळ – Total 120 Minutes** | | **30 Minutes** | **30 Minutes** | **30 Minutes** | **30 Minutes** |